# प्रेस नोट दि. १७/१०/२०२२

## मकोका अंतर्गत दाखल गुन्ह्यात दीड वर्षापासुन फरार आरोपीस शस्त्र विरोधी पथक, गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड कडुन ०१ गावठी पिस्टल सह अटक

सदर प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की, मा. पोलीस आयुक्त, सो, अंकुश शिंदे यांनी अवैध अग्निशस्त्रे वापरणा-या व त्याची विक्री करणा-या रेकॉर्ड वरील आरोपींची माहिती काढुन त्यांचेवर कठोर कारवाई करणेबाबत गुन्हे शाखेच्या शस्त्र विरोधी पथकास सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने आमचे तसेच सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली शस्त्र विरोधी पथकाचे सपोनि अंबरिष देशमुख, अधिकारी व अंमलदार हे रेकॉर्ड वरील आरोपींबाबत गोपनिय माहिती काढत होते.

शस्त्र विरोधी पथकास रेकॉर्ड वरील आरोपींबाबत प्राप्त झालेल्या गोपनिय माहितीचे तांत्रिक विश्लेषण शाखा पिंपरी चिंचवड यांचे मदतिने विश्लेषण करणे सुरु असतांना पुणे पोलिस आयुक्तालय अंतर्गत उत्तमनगर पोलिस स्टेशन येथे दाखल संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधात्मक कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यात मागिल दीड वर्षापासुन फरार असलेला व नेहमी स्वतःजवळ अग्निशस्त्रे बाळगणारा एक कुख्यात गुन्हेगार हा दि. १६/१०/२०२२ रोजी चांदणी चौक बावधन पुणे परिसरात येणार असल्याचे निष्पण्ण झाले. मिळालेल्या माहितीचे अनुषंगाने शस्त्र विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी चांदणी चौक बावधन पुणे परिसरात सापळा रचुन अरोपी नामे **रुतीक कैलास एखंडे वय २२ वर्षे रा. म्हात्रे पुलाजवळ,एरंडवणे गावठाण,पुणे** या १७.०० वा ताब्यात घेतले असता त्याचे कंबरेला एक गावठी बनावटीचे पिस्टल ज्यात एक जिवंत कारतुस असलेले मिळुन आलेने सदर आरोपीविरुद्ध हिंजवडी पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र. ९८२/२०२२ भारतिय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ (२५) सह महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३७(१),(३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदर आरोपी हा पुणे पोलिस आयुक्तालय अंतर्गत उत्तमनगर पोलिस स्टेशन येथे दाखल गु.र.क्र. १८८/२०२१ भा.द.वि. कलम ३०७,२०१,१४३,१४७,१४९,१२०(ब), भा.ह.का. कलम ३(२५),मकोका कलम३(१)(२)(४) गुन्हयातील दीड वर्षापासुन फरार असुन त्याचेविरुद्ध खालिलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.**

१) कोथरुड पो.स्टे. गु.र.क्र. ४०३/२०१७ भा.द.वि. कलम ३६४,३०२,२०१,३४
२) डेक्कन पो.स्टे. गु.र.क्र. ७०/२०१९ भा.द.वि. कलम १४२,१४३,१४७,१४९,३२४, भा.ह.का. कलम ४(२५)
३)उत्तमनगर पो.स्टे. गु.र.क्र. १८८/२०२१ भा.द.वि. कलम ३०७,२०१,१४३,१४७,१४९,१२०(ब), भा.ह.का. कलम ३(२५),मकोका कलम३(१)(२)(४)

---

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. अंकुश शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे सो, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे डॉ. काकासाहेब डोळे सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. पद्माकर घनवट सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. डॉ. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखालील शस्त्र विरोधी पथक गुन्हे शाखा, चे सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख पोलीस उपनिरीक्षक भारत गोसावी, ज्ञानेश्वर दळवी, सहा.पो.उप.नि.एल.के. वाव्हळे, शाम शिंदे पोहवा/ प्रितम वाघ, सी.एम. गवारी वसिम शेख, सागर शेळके,पोशि/ मोहसिन अत्तार, तसेच तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, स.पो.नि. सागर पानमंद, राजेंद्र शेटे, नागेश माळी, अतुल लोखंडे, पोपट हुलगे यांनी केली आहे.**

(डॉ. काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे
पिंपरी चिंचवड